# -: प्रेस नोट :-

## शबरी आदीवासी वित्त व विकास महामंडळ मर्या. गडचिरोली येथील कार्यकारी लेखापाल (कंत्राटी), यांचेवर ॲन्टी करप्शन ब्युरोची कारवाई

शबरी आदीवासी वित्त व विकास महामंडळ मर्या. कर्यालय गडचिरोली विधाते भवन गडचिरोली जिल्हा गडचिरोली येथील कार्यकारी लेखापाल श्री. रूपेश वसंत बारापात्रे, पद-कार्यकारी लेखापल(कंत्राटी) वय-४० वर्षे, ता. जि. गडचिरोली यांना ५०,०००/- रुपयाची लाच स्विकारतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गडचिरोलीच्या पथकाने आज रंगेहात पकडले.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, तक्रारदार हे आदीवासी समाजातील बेरोजगार युवक असून, त्यांनी महाराष्ट्र शासनाच्या ऑनलाईन पोर्टलवर शबरी आदीवासी वित्त व विकास महामंडळ कडे मालवाहु वाहण खरेदी कर्ज मंजुरी करीता अर्ज केला होता. या अणुषंगाने तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी झाल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंध कार्यालय गडचिरोली यांचेकडे तक्रार केली असता पोलीस निरीक्षक श्री. संतोष पाटील यांनी शासकीय पंचासमक्ष लाच मागणीची पडताळणी केली असता, आलोसे नामे रूपेश बारापात्रे, पद- कार्यकारी लेखापाल(कंत्राटी), शबरी आदीवासी वित्त व विकास महामंडळ मर्या. कर्यालय गडचिरोली यांनी आपले लोकसेवक पदाचा दुरूपयोग करून स्वत:चे आर्थिक फायद्या करीता वाम व भ्रष्ट मार्गाने तसेच शाखा व्यवस्थापकाच्या नावाने पंच साक्षीदारासमक्ष ५०,०००/- रूपयांची सुस्पष्ट लाच मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले होते.

या अनुषंगाने पोलीस उपअधिक्षक श्री. चंद्रशेखर पी. ढोले, ला.प्र.वि. गडचिरोली यांचे पर्यवेक्षणात पो.निरी. श्री. संतोष पाटिल, पो.निरी. श्री. शिवाजी राठोड व टिम यांनी तक्रारदाराने दिलेल्या तक्रारीची अत्यंत गोपनीयरित्या शहानिशा करून सापळा कारवाईचे आयोजन केले असता लाच रक्कम ५०,०००/- रूपये स्विकारतांना शबरी आदीवासी वित्त व विकास महामंडळ मर्या. कार्यालय, गडचिरोली विधाते भवन, चामोर्शी रोड गडचिरोली येथे रंगेहात मिळुन आल्याने त्यांचे विरूध्द पोस्टे, गडचिरोली, जिल्हा-गडचिरोली येथे अप क्रं. १६३/२०२५ कलम ७ ७(अ) भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ (संशोधन २०१८) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपीस अटक करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधिक्षक श्री. दिगंबर प्रधान, ॲन्टी करप्शन ब्युरो, नागपूर, श्री. सचिन कदम अपर पोलीस अधिक्षक, ला.प्र.वि. नागपूर, मा. श्री. संजय पुरंदरे अपर पोलीस अधिक्षक, ला.प्र.वि. नागपुर यांचे मार्गदर्शनात व पोलीस उपअधिक्षक श्री. चंद्रशेखर पी. ढोले यांचे पर्यवेक्षणात पो. नि. संतोष पाटिल, पो.नि. शिवाजी राठोड, सफौ/ सुनिल पेद्दिवार, पोहवा/ स्वप्नील बांबोळ, पोहवा/ राजेश पदमगिरीवार, पोहवा/ किशोर

जौजांरकर, पो.अं. संदीप उडान, संदिप घोरमोडे,, हितेश जेट्टीवार, मपोशि/विद्या म्हशाखेत्री, मपोशि/ज्योत्सना वसाके व चापोहवा/ राजेश्वर कुमरे, सर्व लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली यांनी केलेली आहे.पुढिल तपास पोनिरी श्री. संतोष पाटील हे करीत आहेत.

गडचिरोली जिल्हयातील सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, त्यांच्याकडे कोणत्याही शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसम (एजेंट) कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास तात्काळ ॲन्टी करप्शन ब्युरो, गडचिरोली यांचेशी सपंर्क साधावे असे आवाहन पोलीस उप-अधीक्षक श्री. चंद्रशेखर पी. ढोले यांनी केले आहे.

**पोलीस उप-अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालय, गडचिरोली**
**दुरध्वनी क्रमांक - ०७१२-२९५०२०, मो.क्रं. ९९२३३३२७५५**
**टोल फ्रि क्रमांक - १०६४**

17.3.25

(चंद्रशेखर पी.ढोले)
पोलीस उप-अधीक्षक
ला.प्र.वि गडचिरोली